# १. पुराभेदसुत्तं

**प्रस्तावना**

तिपिटक साहित्यामध्ये सुत्तनिपात या ग्रंथाचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. सामाजिक, आर्थिक, भौगोलिक, व्यापारविषयक माहितीच्या दृष्टीने या ग्रंथाचे फार महत्व आहे. या ग्रंथातूनच 'पुराभेद सुत्त' ही कविता अभ्यासाला घेतलेली आहे.

एकदा एका देवतेने तथागताला प्रश्न विचारला, की 'हे गौतम! कोणत्या प्रकारच्या ज्ञानी पुरुषाला आणि कोणत्या प्रकारच्या शीलवान पुरुषाला शांत पुरुष म्हटले जाते?' त्या उत्तम पुरुषाच्या बाबतीत सांगा. तेव्हा तथागत उत्तम पुरूषाच्या बाबतीत सांगतांना म्हणतात, 'जो व्यक्ती तृष्णारहित झालेला आहे. जो विवेकी आहे, राग, ढोंग, कंजुषी, चुगलखोरी पासून अलिप्त आहे. उत्पत्ती आणि विनाशा (अनित्यतेचा सिद्धांत) प्रति तृष्णारहित झालेला आहे, अशा व्यक्तीला शांत पुरूष म्हणतात.'

भारतासह संपूर्ण जगात सुखशांती, समृद्धी व संयमाची गरज असल्यामुळे प्रत्येक राष्ट्रात शांत व संयमी पुरुष असणे काळाजी गरज आहे. (आदर्श नागरिक, कर्तव्य व त्याची जबाबदारी)



कथंदस्सी कथंसीलो, उपसन्तो' ति वुच्चति।
तं मे गोतम पबूहि (पब्रूहि), पुच्छितो उत्तमं नरं।।१।।

वीततण्हो पुराभेदा (ति भगवा), पुब्बमन्तं अनिस्सितो।
वेमज्झे नूपसङ्खेय्यो, तस्स नत्थि पुरक्खतं ।।२।।

अक्कोधनो असन्तासी, अविकत्थि अकुक्कुचो ।
मन्तभाणी अनुध्दतो, स वे वाचायतो मुनि ।।३।।

निरासत्ति अनागते, अतीतं नानुसोचति।
विवेकदस्सी फस्सेसु, दिट्ठिसु च न नियति ।।४।।

पतिलिनो अकुहको, अपिहालु अमच्छरी ।
अप्पगब्भो अजेगुच्छो, पेसुणेय्ये च नो युतो।।५।।

सातियेसु अनस्सावी, अतिमाने च नो युतो।
सण्हो च पटिभानवा, न सद्धो न विरज्जति ।।६।।

लाभकम्या न सिक्खति, अलभो च न कुप्पति।
अविरुद्धो च तण्हायं, रसेसु नानुगिज्झति ।।७।।

उपेक्खको सदा सतो, न लोके सञ्ञते समं।
न विसेसी न नीचेय्यो, तस्स नो सन्ति उस्सदा ।।८।।

यस्स निस्सयना नत्थि, ञत्वा धम्मं अनिस्सितो ।
भवाय विभवाय वा, तण्हा यस्स न विज्जति ।।९।।

तं बूमि (ब्रूमि) उपसन्तो ति, कामेसु अनपेक्खिनं ।
गन्था तस्स न विजन्ति, अंतरी सो विसन्तिकं ।।१०।।

**(सुत्तनिपात)**

---

## शब्दार्थ

**कथंदस्सी (वि.)** – कशाप्रकारचे ज्ञान (कोणत्या प्रकारचे ज्ञान)
**वुच्चति (क्रि.)**– म्हणतात, म्हणतो
**पुच्छितो (क्रि.)**– विचारतो
**अक्कोधनो (वि.)**– क्रोधरहित
**विवेकदस्सि (वि.)**– विवेकी, विवेकदर्शी
**अतिमान (पु.)**– अभिमान
**न सिक्खति (क्रि.)**– अभ्यास करत नाही, शिकत नाही.
**कथंसीलो(वि.)**–कोणत्या प्रकारचे शील असलेला
**उपसंन्तो (क्रि.)**– शांत, परमशांत, अशांत
**विततण्हो (वि.)**– तृष्णारहित
**नानुसोचति (क्रि.)**– पश्चात्ताप करत नाही
**अजेगुच्छो (वि.)**– घृणारहित
**पटिभावना(पु.)** – प्रतिभावान
**अलाभे (पु.)**– अलाभ होणे

**नानुगिज्झति (क्रि.)**– लिप्त होत नाही
**सतो (वि.)**– स्मृतीमान, सतत जागृत राहणारा
**विभवाय (नपुं.)**– विनाश, नष्ट होणे
**अनपेक्खिनं (वि.)**– उपेक्षावान
**अंतरी (वि.)**– पार करणारा
**उपेक्खको (वि.)**– उपेक्षा करणारा
**भवाय (क्रि.)**– होणे (उत्पन्न होणे)
**कामेसु (क्रि.)**– विषयी, विषयाप्रति
**विज्जन्ति (व.क्रि.)**– विद्यमान आहे
**विसन्तिक (स्त्री.)**– तृष्णा

---

## स्वाध्याय

**१. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) देवतेने तथागतांना कोणता प्रश्न विचारला?
२) कोणत्या पुरुषाला कुठेही आसक्ती राहात नाही?
३) तथागताने कोणत्या पुरूषाला मुनि म्हटलेले आहे?
४) कोणती व्यक्ती मिथ्या दृष्टीच्या फेऱ्यात पडत नाही?
५) उताऱ्यातील संवाद कोणामध्ये आहे?

**२. सत्य/ असत्य लिहा.**

१) अप्पगब्भो अजेगुच्छो, पेसुणेय्य च नो युतो।
२) लाभकम्या सिक्खति, अलाभे च न कुप्पति।
३) भवाय विभवाय वा, तण्हा यस्स न विज्जति।

**३. सूचनेनुसार कृती करा.**

१) न सद्धो न विरज्जति। (काळ ओळखा)
२) यस्स निस्सयता..........ञत्वा धम्मं अनिस्सितो (वाक्य पूर्ण करा.)
३) अनच्छरि (माध्यम भाषेत अर्थ लिहा.)
४) लभ (पूर्वकालवाचक अव्यय बनवा)
५) न + अत्थि (संधी करा)

☆☆☆